मा. द्वा कोर्टकडीस    Presented on date 12/12/2023
मा.C 6 Ahmednagar

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर    **P.S.(ठाणे):** एम.आय.डी.सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1125    **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/12/2023 05:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7 (अ) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार    **Date From (दिनांक पासून):** 11/12/2023

**Time Period (कालावधी):**    **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/12/2023

**Time From (वेळेपासून):** 11:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/12/2023    **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/12/2023 05:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

आग्नेय, 6 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गजराज चौक, पोखर्डीनगर-छत्रपती,संभाजी नगर रोड येथील भोसले अम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैभव बबन भगत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो शेंडी, तानगर, जिअहमदन,एम.आय.डी.सी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो शेंडी, तानगर, जिअहमदन,एम.आय.डी.सी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निकीता जितेंद्र शिरसाठ | | | 1. रा घर नं 97, बागरोजा हाडको, ,एम.आय.डी.सी,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मदतनीस संकेत रणजित ससाणे | | | 1. मुळ रा शेंडी, तानगर, जिअहम, सध्या रागाडेकर चौक, निर्मलनगर,,एम.आय.डी.सी, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.12/12/2023

मी वैभव बबन भगत, वय 35 वर्ष , धंदा शेती, रा.मु.पो. शेंडी, ता.नगर, जि.अहमदनगर.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरिल पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि.11/12/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट, ला.प्र.वि.अहमदनगर यांचेशी संपर्क करून त्यांना एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला शेंडी, ता.नगर येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी शेंडी गावातील सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 10/45 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट हे त्यांचेकडील खाजगी चारचाकी वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टॉफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी पोनि आल्हाट यांचे सुचने वरुन त्यांचे चारचाकी वाहनात बसलो व दोन शासकिय पंचासमक्ष लोकसेवकांविरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली की, '' आमचे पणजोबा यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राची सात बारा उता-यावर नोंद लावण्यासाठी व आमचे शेंडी शिवारातील गट क्र. 604, 645 व 647 मधिल क्षेत्राचे हक्कसोडपत्राची नोंद लावण्यासाठी तलाठी शिरसाठ मॅडम या 75,000/-रुपये लाचेची मागणी करत आहेत.'' वगैरे मजकुराची सविस्तर तक्रार मी माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी, दोन्ही पंचांनी व पोनि श्री.आल्हाट यांनी सही केली.

त्यानंतर मी तलाठी शिरसाठ मॅडम यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोनि आल्हाट, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोनि आल्हाट यांनी मला पंच नं 1 यांचेसह तलाठी श्रीमती शिरसाठ यांची तलाठी कार्यालय, शेंडी येथे रवाना केले त्याप्रमाणे आम्ही रवाना होवुन तलाठी कार्यालय, शेंडी येथे जावुन तलाठी शिरसाठ यांची भेट घेतली. त्यावेळी तलाठी शिरसाठ मॅडम यांचेसोबत कामाची चर्चा करत असताना, त्यांनी मला आत्ता 500/- रुपये दे नंतर कट करुन घे असे म्हणुन माझेकडुन 500/- रुपये रक्कम त्यावेळी स्विकारली. त्यानंतर त्यांनी माझेकडे आमचे पणजोबा यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राची सात बारा उता-यावर नोंद लावण्यासाठी व आमचे शेंडी शिवारातील गट क्र. 604, 645 व 647 मधिल क्षेत्राचे हक्कसोडपत्राची नोंद लावण्यासाठी चाळीस ते पन्नास हजार रूपये लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करून मला बु-हाणनगर मंडल अधिकारी कार्यालयातील मंडल अधिकारी यांचे खाजगी मदतनीस नितीन शिर्के यांची भेट घेवुन या कामासाठी नक्की किती रूपये लागतील हे विचारून घे फिक्स करुन घे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच न. 1 असे तेथुन निघुन रवाना केले त्याठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तलाठी शिरसाठ यांनी माझ्याकडे चाळीस-पन्नास हजार रुपये लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केले असल्याचे निष्पन्न झाले. तलाठी मॅडम यांनी मला बु-हाणनगर मंडल अधिकारी कार्यालयातील मंडल अधिकारी यांचे खाजगी मदतनीस नितीन शिर्के यांची भेट घेण्याची सांगितली असल्याने पोनि आल्हाट यांनी माझे ताब्यात व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व पंच नं. 1 यांना नितीन शिर्के यांची भेट घेण्यासाठी रवाना केले.

त्याप्रमाणे मी पंच नं. 1 यांचेसह बु-हाणनगर मंडलअधिकारी कार्यालयात जावुन मंडलअधिकारी यांचे खाजगी

मदतनीस नितीन शिर्के व मंडल अधिकारी श्री. सुतार यांची भेट घेतली व माझ्या कामासंबंधाने बोलणे केले. त्यावेळी नितीन शिर्के व मंडलाधिकारी सुतार यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर मी तलाठी शिरसाठ यांना फोन केला असता त्यांनी त्यांचे खाजगी मदतनीस संकेत ससाणे यांचेबरोबर त्यांचे बोलणे झाले असुन मला त्यांना फोन करण्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी संकेत ससाणे यांना फोन केला असता त्यांनी मला अर्ध्या तासाने भेटतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर मला संकेत ससाणे यांचा फोन आला. आमचेत गजराज चैक, पोखर्डी येथे भेटण्याचे ठरले. त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी माझे ताब्यात व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकीने गजराज चैक येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 असे रवाना होवुन आम्ही गजराज चौक येथे तलाठी शिरसाठ यांचे खाजगी मदतनीस संकेत ससाणे यांची भेट घेतली. संकेत ससाणे यांनी ''तलाठी शिरसाठ मॅडम यांनी सदर कामासाठी 50,000/- रूपये लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना तलाठी मॅडम यांना माझ्यासमोर फोन लावा असे सांगितले. त्यावेळी त्यांनी तलाठी मॅडम यांनी फोन करायचा नाही असे सांगितले आहे असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना एक तासात पैसे घेवुन याच ठिकाणी येतो असे सांगुन तेथुन पंचासह निघुन रवाना केले त्याठिकाणी परत आलो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी पंच नं. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता मी व पंचांनी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तलाठी शिरसाठ यांचे खाजगी मदतनीस ससाणे यांनी माझ्याकडे तलाठी शिरसाठ यांचेसाठी म्हणुन 50,000/-रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तलाठी शिरसाठ यांचे खाजगी मदतनीस ससाणे यांचे विरूध्द गजराज चैक, पोखर्डी येथे लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. मी माझेकडे 40,000/- रु. आहेत असे सांगितले. लाचेची रक्कम मोठी असल्याने व उर्वरित रक्कम 10,000/- रु. मला तात्काळ उपलब्ध करणे शक्य नसल्याने सापळा कारवाई करीता 10,000/- रु. डमी रक्कम वापरण्याचे सर्वानुमते ठरले. असे एकुण 50,000/- लाचेची रक्कम जमा करण्यात आली. पोनि आल्हाट यांनी सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पोनि आल्हाट यांनी सापळा कारवाईबाबत मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या. पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे दुचाकी वाहनाने गजराज चौक, पोखर्डी (नगर-छत्रपती संभाजी नगर रोड) येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि आल्हाट, पंच नं. 2 व सापळा पथक असे पोनि आल्हाट यांचे चारचाकी वाहनाने आले. मी व पंच नं. 1 गजराज चैकातील भोसले अमृततुल्य नाश्ता सेंटर या हॉटेलमध्ये गेलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच नं. 2 असे सदर हॉटेलजवळ येवुन आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबुन राहिले. त्यानंतर मी खाजगी इसम ससाणे यांना फोन केला. त्यांनी दहा मिनीटांनी येतो असे सांगितले. थोडया वेळाने ससाणे तेथे आले. मी त्यांना माझे दोन्ही कामे झाले पाहिजेत असे म्हणुन मी माझेकडील अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने घेवुन त्यांचेजवळील बॅगमध्ये ठेवुन दिली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच स्वीकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला, त्यावेळी सापळा पथकाने ससाणे यांना 17/55 वाजेचे सुमारास पकडले. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संकेत रणजित ससाणे, वय 26 वर्षे, धंदा तलाठी यांचे खाजगी मदतनीस, रा. शेंडी, ता.नगर, जि.अहमदनगर सध्या रा. गाडेकर चौक,निर्मलनगर, तपोवन रोड, अहमदनगर असे सांगितले. पोनि आल्हाट यांनी पंच नं. 2 करवी ससाणे यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी सदर हॉटेलमध्ये ससाणे यांच्या पंचासमक्ष तपासण्या घेण्यात आल्या. त्यानंतर ससाणे यांना सोबत घेवुन पोनि आल्हाट, सापळा पथक हे अहमदनगर शहरातील दिल्ली गेट परीसर, बागरोजा हाडको, नालेगाव येथील तलाठी शिरसाठ यांचे राहते घराजवळ आले. पाठोपाठ मी माझेकडील मोटार सायकलने तेथे पोहोचलो. त्यानंतर ससाणे यांनी त्यांचे मोबाईलवरून तलाठी शिरसाठ यांना फोन करून भगत यांचेकडुन पैसे घेतले असल्याचे सांगितले. त्यावर तलाठी शिरसाठ यांनी त्यापैकी 25,000/-रु. तुझ्याकडे ठेव ते सर्कलला दयावे लागतील व उर्वरित 25,000/-रु. माझे घरी घेवुन ये असे सांगितले.

त्यानंतर पोनि आल्हाट, सापळा पथक असे ससाणे यांना सोबत घेवुन तलाठी शिरसाठ यांचे राहते घरात गेले. त्यावेळी मी बाहेर थांबुन राहिलो. थोडया वेळाने पोनि आल्हाट, सापळा पथक, खाजगी इसम ससाणे असे ला.प्र.वि. कार्यालयात आले.पाठोपाठ मी देखील ला.प्र.वि.कार्यालयात आलो. पुढील कामकाज ला.प्र.वि. कार्यालयात करण्यात आले.

तरी दि.11/12/2023 रोजी 11/50 वा. ते 15/20 वा. च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी दरम्यान यातील लोकसेविका शिरसाठ, तलाठी सजा शेंडी यांनी स्वतः व त्यांचे खाजगी मदतनीस संकेत ससाणे यांनी आमचे पणजोबा यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राची सात बारा उता-यावर नोंद लावण्यासाठी व आमचे शेंडी षिवारातील गट क्र. 604, 645 व 647 मधिल क्षेत्राचे हक्कसोडपत्राची नोंद लावण्यासाठी माझेकडे 50,000/-रुपये लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम लोकसेविका शिरसाठ यांचे सांगण्यावरून खाजगी इसम ससाणे यांनी लाचेच्या यशस्वी सापळा कारवाई दरम्यान 17/21 ते 17/55 वा. दरम्यान गजराज चौक, पोखर्डी(नगर-छत्रपती संभाजी नगर रोड) येथील भोसले अमृततुल्य नाश्ता सेंटर या हॉटेलमध्ये लोकसेविका शिरसाठ यांचेकरीता म्हणुन स्विकारुन सांपत्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेविका निकीता जितेंद्र शिरसाठ, तलाठी सजा शेंडी, ता.नगर, जि.अहमदनगर, रा. घर नं. 97, बागरोजा हाडको, दिल्लीगेट, अहमदनगर व त्यांचे खाजगी मदतनीस संकेत रणजित ससाणे, वय 26 वर्षे, धंदा तलाठी यांचे खाजगी मदतनीस, रा. शेंडी, ता.नगर, जि.अहमदनगर सध्या रा.गाडेकर चौक,निर्मलनगर, तपोवन रोड, अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

दाखल अंमलदार- पोना नेहुल
तपासी अंम-पोनि आल्हाट सो ला.लु प्र लि अहमदनगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajendra Ashok Sanap(I (Inspector)) / 151010004028ASM8501Y

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

एस. सी. नेहुल
पो.ना./९२८, एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन, अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Ashok Sar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402RASM850